RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक १०२] गुरुवार, जुलै २, २०२६/आषाढ ११, शके १९४८ [पृष्ठे ५ , किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ३८६

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २ जुलै २०२६.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेशाचे विनियमन) आणि विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (शुल्काचे विनियमन) अधिनियम, २०१५.**

क्रमांक नियम-२०२६/प्र.क्र.१६७/तांशि-४.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेशाचे विनियमन) आणि विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (शुल्काचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा. २८) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ३ ची पोट-कलमे(१) व (२) तसेच कलम २ चा खंड(द) याद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून काढलेली शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. एईसी-२०२४/प्र.क्र.७०/तांशि-४, दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ (यात यापुढे जिचा निर्देश, "उक्त अधिसूचना" असा केला आहे) मधील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे, उक्त अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी व्यावसायिक पाठ्यक्रम असल्याचे यात विनिर्दिष्ट केलेले पुर्णवेळ व्यावसायिक शिक्षण पदवीपूर्व पाठ्यक्रम व व्यावसायिक शिक्षण पदव्युत्तर पदवी पाठ्यक्रम आणि त्यांच्या प्रवेशांच्या पात्रतेच्या शर्ती व आवश्यकता अधिसूचित केलेल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने, तिच्या मान्यता प्रक्रिया हस्तपुस्तिका २०२४-२७ द्वारे विवक्षित पदवीपूर्व व पदव्युत्तर तांत्रिक शिक्षण पाठ्यक्रमांच्या प्रवेशाच्या पात्रतेमध्ये केलेले फेरबदल विचारात घेता, अशा पाठ्यक्रमांकरिता, उक्त अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या पात्रतेच्या शर्तींमध्ये सुधारणा करणे इष्ट आहे ;

आणि ज्याअर्थी, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी काही औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या पदवीपूर्व शिक्षण पाठ्यक्रमांच्या प्रवेशाच्या पात्रतेमध्ये त्यांचे परिपत्रक क्र.१४-२/२०२५-पीसीआय, दि. १२.०१.२०२६ अन्वये केलेले फेरबदल विचारात घेता, अशा पाठ्यक्रमांकरिता उक्त अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या पात्रता शर्तींमध्ये सुधारणा करणे इष्ट आहे.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ची पोट-कलमे (१) व (२) तसेच कलम २ चा खंड (द) यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, उपरोक्त प्रयोजनांसाठी, उक्त अधिसूचनेत पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

१. उक्त अधिसूचनेस जोडलेल्या अनुसूची-अ मधील,—

(१) अनुक्रमांक ६ येथील नोंदीमधील, प्रथम वर्ष-औषधनिर्माणशास्त्र (४ वर्ष कालावधी) अभ्यासक्रमाशी संबंधित असणाऱ्या स्तंभ(३) मध्ये नमूद “(१) महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेले उमेदवार” या मथळ्यामध्ये, खंड(दोन) मधील परंतुक वगळण्यात येईल ;

(२) अनुक्रमांक ६ येथील नोंदीमधील, प्रथम वर्ष-औषधनिर्माणशास्त्र (४ वर्ष कालावधी) अभ्यासक्रमाशी संबंधित असणाऱ्या स्तंभ(३) मध्ये नमूद “(२) अखिल भारतीय उमेदवारी असलेले उमेदवार” या मथळ्यामध्ये, खंड(दोन) मधील परंतुक वगळण्यात येईल ;

(३) अनुक्रमांक ६ येथील नोंदीमधील, प्रथम वर्ष-औषधनिर्माणशास्त्र (४ वर्ष कालावधी) अभ्यासक्रमाशी संबंधित असणाऱ्या स्तंभ(३) मध्ये नमूद “(३) अनिवासी भारतीय किंवा भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेल्या व्यक्ती किंवा भारतीय वंशाच्या व्यक्ती, आखाती देशांतील भारतीय कामगारांची मुले, विदेशी नागरिक उमेदवारी असलेला उमेदवार” या मथळ्यामध्ये, खंड(एक) मधील परंतुक वगळण्यात येईल ;

२. उक्त अधिसूचनेस जोडलेल्या अनुसूची-ब मधील,—

सहयोगी / ट्रीनिंग पद्धतीद्वारे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम पाठ्यक्रमाशी संबंधित अनुक्रमांक ११ च्या नोंदीनंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईल,—

| | | |
|---|---|---|
| “१२ | पदव्युत्तर पदविका व्यवस्थापन (पीजीडीएम) | (१) महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेला उमेदवार.—<br>उमेदवार,—<br>(एक) भारतीय नागरिक असावा ; |
| | (२ वर्ष कालावधी / १८ महिने कालावधी)<br>पदव्युत्तर प्रमाणपत्र व्यवस्थापन (पीजीसीएम)<br>(१ वर्ष कालावधी) | (दोन) विद्यापीठ अनुदान आयोगाने किंवा भारतीय विद्यापीठ संघाने मान्यता दिलेल्या कोणत्याही विद्यापीठाने प्रदान केलेली कोणत्याही विद्याशाखेतील किमान तीन वर्ष कालावधीची स्नातक पदवी परीक्षा किंवा त्यास समतुल्य परीक्षा एकत्रित मिळून किमान पन्नास टक्के किंवा समतुल्य गुणांसह (महाराष्ट्र राज्यातील आरक्षित प्रवर्गाच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या आणि दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीतच केवळ, किमान पंचेचाळीस टक्के किंवा समतुल्य गुणांसह) उत्तीर्ण असावा ; |
| | | (तीन) सक्षम प्राधिकरणाने आयोजित केलेल्या सीईटीमध्ये नॉन झिरो प्राप्तांक मिळविलेला असावा. |
| | | (२) अखिल भारतीय उमेदवारी असलेले उमेदवार, जम्मू काश्मीर संघराज्य क्षेत्र व लडाख संघराज्य क्षेत्र यामधील स्थलांतरित उमेदवारी असलेले उमेदवार.— |
| | | उमेदवार,— |
| | | (एक) भारतीय नागरिक असावा ; |
| | | (दोन) विद्यापीठ अनुदान आयोगाने किंवा भारतीय विद्यापीठ संघाने मान्यता दिलेल्या विद्यापीठाने प्रदान केलेली कोणत्याही विद्याशाखेतील किमान तीन वर्ष कालावधीची स्नातक पदवी परीक्षा किंवा त्यास समतुल्य परीक्षा एकत्रित मिळून किमान पन्नास टक्के किंवा समतुल्य गुणांसह (महाराष्ट्र राज्यातील आरक्षित प्रवर्गांच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या आणि दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीतच केवळ किमान पंचेचाळीस टक्के गुण किंवा समतुल्य गुणांसह) उत्तीर्ण असावा ; |

| | | |
|---|---|---|
| | | (तीन) पुढीलपैकी कोणत्याही एका परीक्षेमध्ये नॉन झिरो पॉझिटिव्ह प्राप्तांक मिळविलेला असावा :– |
| | | सक्षम प्राधिकरणाने आयोजित केलेली सामायिक प्रवेश परीक्षा (CET) किंवा भारतीय व्यवस्थापन संस्थेने आयोजित केलेली सामायिक प्रवेश परीक्षा (CAT) किंवा राष्ट्रीय परीक्षा एजन्सीने आयोजित केलेली सामायिक व्यवस्थापन अभियोग्यता चाचणी परीक्षा (CMAT) किंवा झेवियर्स व्यवस्थापन शाळा जमशेदपूर यांनी आयोजित केलेली झेवियर्स अभियोग्यता चाचणी परीक्षा (XAT) किंवा भारतीय व्यवस्थापन शाळा असोसिएशनने आयोजित केलेली व्यवस्थापन प्रवेशांसाठी प्रवेश परीक्षा (ATMA) किंवा भारतीय व्यवस्थापन असोसिएशनने आयोजित केलेली व्यवस्थापन अभियोग्यता चाचणी परीक्षा (MAT) किंवा पदवीधर व्यवस्थापन प्रवेश परिषदेने (युएसए) आयोजित केलेली पदवीधर व्यवस्थापन अभियोग्यता चाचणी परीक्षा (GMAT). |
| | | (३) अनिवासी भारतीय किंवा भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेल्या व्यक्ती किंवा भारतीय वंशाच्या व्यक्ती, आखाती देशांतील भारतीय कामगारांची मुले, विदेशी नागरिक उमेदवारी असलेले उमेदवार.– |
| | | (एक) उमेदवार, विद्यापीठ अनुदान आयोगाने किंवा भारतीय विद्यापीठ संघाने मान्यता दिलेल्या विद्यापीठाने प्रदान केलेली कोणत्याही विद्याशाखेतील किमान तीन वर्ष कालावधीची स्नातक पदवी परीक्षा किंवा त्यास समतुल्य परीक्षा एकत्रित मिळून किमान पन्नास टक्के किंवा समतुल्य गुणांसह उत्तीर्ण असावा ; |
| | | (दोन) अधिनियमान्वये व्याख्या केल्याप्रमाणे, समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी घोषित केलेले इतर कोणतेही पात्रता निकष व आवश्यकता. |

३. उक्त अधिसूचनेस जोडलेल्या अनुसूची-ब नंतर असलेल्या खंड (एक) या ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल,–

“(एक) पीडीडीएम /पीजीसीएम अभ्यासक्रमाचे प्रवेश समुचित प्राधिकरणाद्वारे शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासून करण्यात येतील”.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संतोष पु. खोरगडे,**
सहसचिव, महाराष्ट्र शासन.

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mumbai 400 032, dated the 2nd July 2026.

*NOTIFICATION*

THE MAHARASHTRA PROFESSIONAL EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION OF ADMISSIONS) AND UNAIDED PRIVATE PROFESSIONAL EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION OF FEES) ACT, 2015.

No.Niyam-2026/C.R.167/TE-4.—Whereas, the Government of Maharashtra has, *vide* Government Notification, Higher and Technical Education Department, No.AEC-2024/C.R.70/TE-4, dated the 14th February 2025 (hereinafter referred to as "the said notification"), in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 3 read with clause (*r*) of section 2 of the Maharashtra Professional Educational Institutions (Regulation of Admissions) and Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Fees) Act, 2015 (Mah. XXVIII of 2015) (hereinafter referred to as "the said Act"), notified the Professional Education Under Graduate Courses and Professional Education Post Graduate Courses mentioned in the Schedules appended thereto to be the Full Time Professional Education for the purposes of the said Act, and specified the eligibility conditions and requirements for admissions thereto ;

And whereas, in view of the modifications in the eligibility for admission to certain under graduate and postgraduate technical education courses by the All India Council for Technical Education *vide* its Approval Process Handbook, 2024-27, it is expedient to amend eligibility conditions specified in the said notification for such courses ;

And whereas, in view of the modifications in the eligibility for admission to certain under graduate pharmacy education courses by the Pharmacy Council of India *vide* its Circular No.14-2/2025-PCI, dated the 12th January 2026, it is expedient to amend eligibility conditions specified in the said notification for such courses ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 3 read with clause (*r*) of section 2 of the said Act, the Government of Maharashtra hereby amends the said Notification, as follows, namely :—

**1. In Schedule – A** appended to the said notification,–

*(1)* In entry at Sr. No. 6 relating to First Year–Pharmacy (4 years duration), in column (*3*), under the heading "(*1*) Maharashtra State Candidature Candidate", the proviso to clause *(ii)* shall be deleted ;

*(2)* In entry at Sr. No. 6 relating to First Year–Pharmacy (4 years duration), in column *(3)*, under the heading *"(2)* All India Candidature Candidates.-", the proviso to clause *(ii)* shall be deleted ;

*(3)* In entry at Sr. No. 6 relating to First Year–Pharmacy (4 years duration), in column *(3),* under the heading *"(3)* Non Resident Indian (NRI) or Overseas Citizen of India (OCI) or Person of Indian Origin (PIO), Children of Indian workers in the Gulf countries, Foreign National Candidature Candidate.-", the proviso to clause *(i)* shall be deleted.

**2. In Schedule – B** appended to the said notification,–

*(1)* After the entry at Sr. No. 11, relating to the admission to the Post Graduate Courses through collaborative / twinning mode, the following entry shall be added, namely,–

| | | |
|---|---|---|
| "12. | Post Graduate Diploma in Management (PGDM) (2 Years Duration / 18 months Duration)<br><br>Post Graduate Certificate in Management (PGCM) (1 Year Duration) | ***(1)* Maharashtra State Candidature Candidate**<br>The candidate,—<br>(i) should be a citizen of India ;<br>(ii) should have passed minimum three year Bachelor's Degree awarded by any of the Universities recognized by University Grants Commission or Association of Indian Universities in any discipline with at least fifty percent. marks in aggregate or equivalent (at least forty five percent. in case of candidates of reserved categories, Economically weaker section and Persons With Disability Candidates belonging to Maharashtra State only) or its equivalent ;<br>(iii) should have obtained non zero score in CET conducted by the Competent Authority ;<br>***(2)* All India Candidature Candidates, Union Territory of Jammu and Kashmir and Union Territory of Ladakh Migrant Candidature Candidates.–**<br>The candidate,–<br>(i) should be a citizen of India ;<br>(ii) should have passed minimum three year Bachelor's Degree awarded by the University recognised by University Grants Commission or Association of Indian Universities in any discipline with at least fifty per cent. marks in aggregate or equivalent (at least forty five percent. in case of candidates of reserved categories, Economically Weaker Section and Persons With Disability Candidates belonging to the Maharashtra State only) or its equivalent ;<br>(iii) should have obtained non zero positive score in any one of the following examinations, namely :–<br>CET conducted by the Competent Authority or Common Admission Test (CAT) conducted by Indian Institute of Management or Common Management Aptitude Test (CMAT) conducted by National Testing Agency or Xavier Aptitude Test (XAT) conducted by Xavier School of Management Jamshedpur or Entrance Test for Management Admissions (ATMA) conducted by the Association of Indian Management Schools or Management Aptitude Test (MAT) Conducted by All India Management Association or Graduate Management Aptitude Test (GMAT) Conducted by Graduate Management Admission Council, United States of America.<br>***(3)* Non Resident Indian (NRI) or Overseas Citizen of India (OCI) or Person of Indian Origin (PIO), Children of Indian workers in the Gulf countries, Foreign National Candidature Candidates.–**<br>(i) The candidate should have passed minimum three year Bachelor's Degree awarded by the University recognized by University Grants Commission or Association of Indian Universities in any discipline with at least fifty percent. marks in aggregate or its equivalent ;<br>(ii) Any other eligibility criteria and requirement declared from time to time by the appropriate authority as defined under the Act.". |

**3.** After **Schedule – B** appended to the said notification, for the clause *(1),* the following clause shall be substituted, namely :–

"*(1)* Admissions to PGDM / PGCM courses shall be effected by the Competent Authority from the Academic Year 2027-2028.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANTOSH P. KHORGADE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.